नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/12/2022 (मंगळवार) सायंकाळ

---

## पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीणच्या आस्थापनेवर नागपूर ग्रामीण अनुकंपा पोलीस अंमलदारांची निवड

पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीणच्या आस्थापनेवर कर्तव्यावर असतांना जे पोलीस कर्मचारी यांचे अपघाती किंवा आकस्मिक निधन झाले. अशा अपघातामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या अथवा आकस्मिक निधन झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सहाय्य करण्याच्या दृष्टीकोणातून अशा कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीणच्या आस्थापनेवर अनुकंपा पोलीस शिपाई भरती प्रक्रीया –२०२२ करिता अनुकंपा तत्वावर दिनांक २६/१२/२०२२ रोजी नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदाची निवड करण्यात आली आहे. यामध्ये एकुण १५ पोलीस अंमलदार (शिपाई) ची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्यात आली असुन त्यामध्ये ०९ पुरूष व ०६ महिला यांचा समावेश आहे. नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांचे हस्ते अनुकंपा नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आलेले आहे. यावेळी मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले, पोलीस उप अधीक्षक (गृह) श्री. संजय पुरंदरे उपस्थित होते.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर